0 1 DEC 2025
पुढारी



कोल्हापूर : स्त्री मुक्ती परिषदेत बीजभाषण करताना शारदा साठे. मंचावर रेश्मा खाडे, छाया राजे, डॉ. भारती पाटील आणि अमोल केरकर.

# शोषणविरहित जगासाठी स्त्रीवादी चळवळीची आवश्यकता : साठे

## शिवाजी विद्यापीठात स्त्री मुक्ती परिषदेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शोषणविरहित व मानवतापूर्ण जगासाठी स्त्रीवादी चळवळीची आजच्या काळात मोठी आवश्यकता आहे, असे प्रतिपादन मुंबईच्या स्त्री मुक्ती संघटनेच्या विश्वस्त शारदा साठे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व महाराष्ट्र स्त्री मुक्ती संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री मुक्ती चळवळीला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आयोजित कोल्हापूर जिल्हा स्त्री मुक्ती परिषदेच्या उद्‌घाटन समारंभात बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. परिषदेच्या समन्वयक छाया राजे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. रेश्मा खाडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रीती सरदेसाई यांनी आभार मानले. संघटनेच्या अमोल केरकर, तनुजा शिपूरकर, सीमा पाटील उपस्थित होते. स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने या विषयावरील सत्रात माजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित, डॉ. भारती पाटील यांनी सहभाग घेतला. 'पुरुषभान' या विषयावरील सत्रात मिलिंद चव्हाण आणि प्रसाद कुलकर्णी यांनी तर हिंसाचार-मानसिक, सामाजिक विषयावरील सत्रात तनुजा शिपूरकर, मयुरी आळवेकर, सुनीता पाटील यांनी सहभाग घेतला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ऐसे कैसे झाले भोंदू? या विषयावर नाटिका सादर केली.

0 1 DEC 2025
लोकमत

# खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये प्रतीकला कांस्य



**कोल्हापूर** : छत्रपती राजाराम टिंबर मार्केट येथील ऑलिम्पिक टारगेट शूटिंग रेंजचा खेळाडू प्रतीक आनंदा जोंग याने रणवीर काटकर आणि अथर्व पाटील यांच्या साथीने शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत राजस्थान येथे घेतलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धेमध्ये दहा मीटर एअर रायफल मेन प्रकारात सांघिक कांस्यपदक पटकावले. त्याला प्रशिक्षक विनय पाटील, सुहास जगदाळे, वीणा पाटील, तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. जिल्हा रायफल असोसिएशनचे त्याला प्रोत्साहन मिळाले.